जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर
P.R.O Office, Palghar
Phone No. 02525-297032, Reader Mob No.8669604078
Address: SP Office, Bidco Road, Palghar(W)
E-mail : propalghar@gmail.com

Reference No.: Date:

# प्रेसनोट दि.२६/०७/२०१८

पालघर पोलीस दलाकडुन दि.२३/०७/२०१८ रोजी www.palgharpolice.gov.in या नविन व आधुनिक संकेतस्थळाचे उद्धाटन करण्यात आले. मा .डॉ. प्रज्ञा सरवदे, मा.अपर पोलीस महासंचालक (प्रशासन) म.रा.,मुंबई यांनी दि.२३/०७/२०१८ रोजी केलेल्या पालघर दौरा कार्यक्रमामध्ये सदर संकेतस्थळाचे उद्धघाटन केले आहे. सदर संकेतस्थळामुळे जनतेची बरीच कामे सुलभ होणार आहेत. व त्यामुळे पोलीस कामकाज अतिजलद व पारदर्शक होण्यास मदत मिळेल तरी पालघर पोलीस दलाकडुन जनतेस आवाहन करण्यात येते की जास्तीत जास्त प्रमाणात सदर संकेतस्थळाचा वापर करावा.

**पालघर पोलीस दलाच्या नविन व आधुनिक संकेतस्थळाची (www.palgharpolice.gov.in) वैशिष्टये खालील प्रमाणे :-**

१) सदर संकेतस्थळ मराठी आणि इंग्रजी या दोन्ही भाषांमध्ये उपलब्ध आहे.
२) आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केल्याने सायबर सुरक्षेची खात्री.
३) नागरीकांसाठी वापरण्यास सोपे व माहीती पुर्ण.
४) ऑनलाईन तक्रार आणि गोपनीय माहीती देण्याची सोय .
५) सर्व पोलीस ठाणे,विषेश पथके,उपविभागिय पोलीस अधिकारी यांची इत्यंभूत माहीती आणि सर्व वरीष्ठ अधिका-यांचे संपर्क क्रमांकही संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.
६) नागरीकांना आता भाडेकरुंची माहीती संबधित पोलीस ठाण्यांना घर बसल्या ऑनलाईन देता येणार आहे.
७) मोबाईल, इतर मौल्यवान वस्तु अथवा महत्वाचे व गोपनीय कागदपत्रे हरविल्यास अथवा सापडल्यास नागरीकांना त्याची माहीती संबधित पोलीस ठाण्यांना घर बसल्या ऑनलाईन देता येणार आहे.
८) सदरचे संकेतस्थळ हे अंध व्यक्तींना वापरता यावे या करीता " स्क्रीन रिडर " या विषेश तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे.
९) सदरचे संकेतस्थळ हे मोबाईल, लॅपटॉप, डेस्क टॉप, अशा सर्व प्रकारच्या उपकरणांन वर हाताळण्यास पुरक आहे.
१०) सदरचे संकेतस्थळ हे भारतीय शासकीय संकेतस्थळांच्या (जी.आय.जी.डब्ल्यु ) निर्देशनानुसार तयार करण्यात आलेली आहे.
११) नागरीकांच्या सुरक्षीतता आणि सतर्कतेसाठि विशेष असे " सिटिझन अर्लट वॉल " हे टॅब देण्यात आलेले आहे.
१२) सुरक्षा सुचना, पोलीसांची चांगली कामगिरी , माहीतीचा अधिकार , महत्वाची संकेतस्थळे , व इतर गुन्हे संबधित सर्व माहीती, प्रसार माध्यमांनसाठि प्रसिध्दी पत्रक संकेतस्थळावर प्रसारीत करण्यात आलेले आहेत.

सदर कार्यक्रमाकरिता मा. श्री. नवल बजाज, विशेष पोलीस महानिरीक्षक कोकण परिक्षेत्र, नवी मुंबई, मा.श्री. मंजुनाथ सिंगे, पोलीस अधीक्षक पालघर, मा.श्री. राजतिलक रोशन,अपर पोलीस अधीक्षक वसई, मा.श्री.योगेश चव्हाण,अपर पोलीस अधीक्षक पालघर, मा.श्री. निमीत गोयल, पोलीस उपअधीक्षक (गृह) पालघर, मा.श्री.विकास नाईक, उपविभागिय पोलीस अधिकारी पालघर इत्यादी उपस्थित होते.